तरुण भारत
Akola Main | 2023-10-15 | Page- 7
epaper.tarunbharat.net

# अरविंद कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सुरक्षेबाबत कार्यशाळा

**◆ आकोट, १४ ऑक्टोबर**

तालुक्यातील अडगाव येथील अरविंद कनिष्ट महाविद्यालयात नुकतीच सायबर सुरक्षे बाबत कार्यशाळा कार्यक्रम संपन्न झाली. यावेळी अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू, आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली सुमित सपकाळ व अनिकेत भुडके या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षे बाबत, ऑनलाईन फसवणूक, वाढता सोश मिडीयाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक, आपण करीत असलेली ऑनलाईन खरेदी या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापिका मालती देशमुख होत्या. हा कार्यक्रम क्विक हिल फाऊंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल मुंबई यांच्या सहयोगाने आयोजिला होता.

यात मान्यवरांनी शाळेतील विद्यार्थ्यांना सायबरसुरक्षा म्हणजे काय? आणि सायबर क्राईमचे कोणते प्रकार पडतात, वाढत्या सोशल मिडीयाच्या माध्यमातून ऑनलाईन खरेदीची फसवणूक कशी होते, मिडीयाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक ,नवनवीन मोबाईल मध्ये येणारे ऐप, फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जाते फेक वेबसाईटस कशा ओळखाव्या, एटी एम पासवर्ड, ओटीपी, याबाबत फसव्या लिंक पासून दूर राहणे या बाबत मार्गदर्शन केले. ◀*(तभा वृत्तसेवा)*